# चारा पिकांचे नियोजन

# व

# उत्पादन तंत्रज्ञान

प्रा. प्रसन्नकुमार सुराणा
संशोधन अधिकारी, गवत संशोधन योजना
महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी, जि. अहमदनगर. ४१३ ७२२.

# * चारा पिके एक दृष्टीक्षेप *

- पशुपालक व दुग्धव्यवसायामध्ये हिरवा चाऱ्याला अनन्य साधारण महत्त्व.
- आहारामध्ये ७० टक्के भाग चाऱ्याचा व ३० टक्के भाग पशुखाद्याचा.
- एकूण उत्पादन खर्चाच्या ६५ ते ७० टक्के खर्च चारा व पशुखाद्यावर.
- भारतात चाऱ्याखालील क्षेत्र फक्त ६.६ टक्के.
- भारतात हिरव्या चाऱ्यांची ६२ टक्के, सुक्या चाऱ्याची २२ टक्के व पशुखाद्याची ६४ टक्के कमतरता.
- चारा उत्पादनामध्ये एकदल व द्विदल पिकांचा समावेश महत्त्वाचा.
- सतत हिरव्या चाऱ्यासाठी बहुवार्षिक चारा पिकांची लागवड गरजेची.
- शेतातील पिके व चाऱ्यांची प्रक्रिया करणे गरजेचे.

# महाराष्ट्रात चाऱ्याची वार्षिक आवश्यकता व उपलब्धता

(लक्ष मे. टन)

| अ.क्र. | तपशिल | हिरवा चारा | वाळलेला चारा |
|---|---|---|---|
| १. | आवश्यकता | ११०३.६० | ४४१.४३ |
| २. | उपलब्धता | ४४९.५१ | ३०४.६४ |
| ३. | कमतरता | ६५४.०९ | १३६.७९ |
| ४. | तुटीची टक्केवारी | ५९.२६ | ३०.९८ |

| * वैरणीच्या तूटीची सर्वसाधारण कारणे* |
| --- |
| ➢ नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा वाढत असलेला कल |
| ➢ निवासी व औद्योगिक क्षेत्रामध्ये होत असलेली वाढ |
| ➢ वाढते नागरीकरण |
| ➢ गायरान / सामाईक क्षेत्रातील अतिक्रमण |
| ➢ वनक्षेत्रात लागणारी आग |
| ➢ निष्काळजीपणे वैरणीचा करण्यात येत असलेला वापर |
| ➢ कमी झालेले बांधक्षेत्र |
| ➢ गवताचा पॅकींगसाठी होणारा उपयोग |

| * वैरणीच्या तूटीचा पशुधनावर होणारा विपरीत परिणाम* |
| --- |
| ➢ शारीरीक वाढ मंदावणे |
| ➢ रोग प्रतिकारक शक्ती कमी होणे |
| ➢ वंध्यत्व समस्या |
| ➢ दुध उत्पादन कमी होणे |
| ➢ मांस आणि अंडी उत्पादनावर परिणाम |

# चारा उपलब्धतेचे स्त्रोत व टक्केवारी

| अ.क्र. | स्त्रोत | टक्केवारी |
|---|---|---|
| १. | कृषि पिंकाचे दुय्यम उत्पादन व अवशेष | ६०.०० |
| २. | गायरान, चराऊ क्षेत्र, गवती कुरण | ९.३० |
| ३. | वनक्षेत्र, जंगल क्षेत्र | १०.३० |
| ४. | बांधावरील गवत | ५.२७ |
| ५. | पडिक, लागवडीस अयोग्य क्षेत्र | ५.३७ |
| ६. | वैरण पिकापासून मिळणारी वैरण | ३.१६ |
| ७. | अवर्षण, कमी पर्जन्यमान यामुळे वाया गेलेल्या कृषि पिकापासून मिळणारी वैरण | ६.६० |
| | एकुण | १००.०० |

## * हिरव्या चाऱ्याचे उत्पादनातील महत्वाचे घटक *

**जमीन :** चारा पिकांसाठी जमीन व मशागत मध्यम प्रतीची आणि चांगला निचरा होणारी जमीन.

**खते:** माफक प्रमाणात खते, सेंद्रीय खते व रासायनिक खतांचा समावेश होतो. सकस हिरव्या चाऱ्याच्या उत्पादनासाठी नत्रयुक्त खंताचा मोठा वाटा आहे.

**सुधारीत जाती :** चारा पिकांच्या सुधारीत जाती वापराने २५ ते ३० टक्के उत्पादन वाढू शकते.

**बियाणे प्रक्रिया :** एकदल पिकांसाठी ॲझोटोबॅक्टर व द्विदल पिकासाठी रायझोबियम जिवाणू संवर्धन २५० ग्रॅम प्रति १० किलो बियाण्यास पेरणीपूर्वी चोळावे.

**सिंचन व्यवस्था :** वर्षभर चांगल्या प्रतीच्या व भरपूर हिरव्या चाऱ्याच्या उत्पादनासाठी सिंचन व्यवस्थेची प्रमुख गरज असते.

**रोगराई नियंत्रण :** किटकनाशकांच्या फवारणीनंतर किमान २१ दिवस तरी फवारलेला चारा खाद्य म्हणून वापरु नये.

**कापणी व्यवस्थापन :** चारा पिकांच्या लागवडीत वेळेवर कापणी करणे महत्त्वाचे असते. एकूण उत्पादनात सकसता व पोषणमूल्ये कमी होणे हे दुष्परिणाम दिसतात. नंतरच्या फुटव्यावर परिणाम होवून नंतरच्या कापणीवरही प्रतिकुल परिणाम होतो. फुलोऱ्यातील कापणी सर्व दृष्टीने फायदेशीर व उपयुक्त असते.

# * चारा पिकांचे वर्गीकरण*

## ऋतुमानानुसार

१) खरीप हंगाम :

❖ एकदल पिके :- ज्वारी, बाजरी, मका, संकरीत नेपिअर व इतर गवते.

❖ द्विदल पिके :- चवळी, स्टॉयलो, दशरथ इ.

२) रब्बी हंगाम :

❖ एकदल पिके :- ओट, मका, ज्वारी इ.

❖ द्विदल पिके :- लसुन घास, बरसिम (घोडा घास) इ.

३) उन्हाळी हंगाम :

❖ एकदल पिके :- मका, ज्वारी, बाजरी इ.

❖ द्विदल पिके :- चवळी

४) बहुवार्षिक :

❖ एकदल पिके :- संकरीत नेपिअर, मारवेल गवत, पवना, मद्रास अंजन, डोंगरी इ.

❖ द्विदल पिके :- लसून घास, स्टॉयलो, दशरथ इ.

# ज्वारी

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | रुचिरा, फुले अमृता, एम.३५-१, फुले गोधन |
| पेरणीची वेळ, पध्दत व बियाणे | खरीप : जून - जुलै, रब्बी : सप्टेंबर - ऑक्टोबर, उन्हाळी : फेब्रुवारी - मार्च , ३० से.मी. अंतरावर पेरणी करावी. हेक्टरी ४० किलो बियाणे |
| खते (कि./ हे.) | ५ टन शेणखत, १०० कि. नत्र : ५० कि. स्फुरद : ४० कि. पालाश |
| कापणी | ५० टक्के पीक फुलोऱ्यात असताना कापणी करावी (६५-७० दिवसांनी) |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (क्वि./हे.) | ५०० ते ५५० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ८ ते १०%, खनिज पदार्थ ११.७०%, कॅलशियम ३३.६%, |



Forage Sorghum- Ruchira

# बाजरी

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | जायंट बाजरा, बायफ बाजरा |
| पेरणीची वेळ | खरीप : जून - जुलै, उन्हाळी : फेब्रुवारी - मार्च |
| पेरणीची पध्दत | ३० से.मी. अंतरावर पेरणी करावी. |
| बियाणे ( कि./हे.) | १० किलो / हेक्टरी |
| खते (कि./ हे.) | ५ टन शेणखत, ९० किलो नत्र : ४० किलो स्फुरद : ३० किलो पालाश |
| कापणी | ५० टक्के पीक फुलोऱ्यात असताना कापणी करावी (५५-६० दिवसांनी) |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (क्वि./हे.) | ४५० ते ५०० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ७ ते ९%, काष्टमय तंतु २४.९% ,खनिज पदार्थ ८.२%, पिष्टमय पदार्थ ५७.९%, |



Forage bajra- Giant bajra

# मका

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | आफ्रिकल टॉल, मांजरी कंपोझीट, विजय, गंगा सफेद-२ |
| पेरणीची वेळ, पध्दत व बियाणे | खरीप : जून - जुलै, रब्बी : ऑक्टोबर - नोंव्हेंबर, उन्हाळी : फेब्रुवारी - मार्च, ३० से.मी. अंतरावर पेरणी करावी. ७५ किलो / हेक्टरी बियाणे |
| खते (कि./ हे.) | ५ टन शेणखत, १०० किलो नत्र : ५० किलो स्फुरद : ५० किलो पालाश या पैकी ५० किलो नत्र : ५० किलो स्फुरद : ५० किलो पालाश पेरणीच्या वेळी व ५० किलो नत्र पेरणीनंतर ३० दिवसांनी |
| कापणी | ५० टक्के पीक फुलोऱ्यात असताना कापणी करावी (६५-७० दिवसांनी) |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (क्वि./हे.) | ५०० ते ६०० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ९ ते ११ %, काष्टमय तंतु ४.३% ,खनिज पदार्थ ६%, पिष्टमय पदार्थ ५०%, |

| पिक संरक्षण | मक्यावरील अमेरीकन लष्करी अळीचे एकात्मिक व्यवस्थापन |
|---|---|
| | १. किडग्रस्त पिकाच्या काढणीनंतर शेतीची दिवसा खोल नांगरणी करावी.<br>२. पिकावरील अंडीसमुह गोळा करुन नष्ट करुन टाकावे.<br>३. पिकाचे नियमित सर्वेक्षण करावे व या किडीचा पतंग आकर्षिक करण्यासाठी प्रकाश सापळे व कामगंध सापळयांचा वापर करावा.<br>४. टेलेनोमस रेमस या किटकांचे एकरी ५० हजार अंडी सात दिवसाच्या अंतराने दोन वेळा याप्रमाणे शेतात परोपजीवी किटक सोडावे. त्यानंतर ८ ते १० दिवसापर्यंत रासायनिक किटनाशकांची फवारणी करु नये.<br>५. लवकर पक्क होणाऱ्या वाणाची निवड करुन लवकर व एकाच वेळी सर्वांनी पेरणी करावी व याचा गाव किंवा विभागीय पातळीवर अवलंब करावा.<br>६. फुले मेटऱ्हीझीयम ॲनीसोप्ली किंवा फुले नोमूरीया या जैविक किटकनाशकाच्या ५० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून संध्याकाळच्या वेळेस फवारणी करावी.<br>७. अळीच्या प्रादुर्भावामुळे झालेले नुकसान हे ५ % आढळल्यास निंबोळी अर्क ५% किंवा ॲझाडिरॅक्टिन १५०० पीपीएम ५० मिली प्रति १०लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.<br>८. अळीचा प्रादुर्भाव १०% पेक्षा जास्त असल्यास स्पिनोटोरम ११.७% @४ मिली प्रति १० लिटर पाणी किंवा क्लोरॅनट्रॅनीलीप्रोल १८.५%SC@२.५ मिली प्रति १० लिटर किंवा इमानेक्टीन बेनंझोएट ५%SG@४ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात करावी. |




Maize- African Tall

# चवळी

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | श्वेता, इ.सी.४२१६, बुंदेल लोबीया, यु.पी.सी. ५२८६ |
| पेरणीची वेळ | खरीप : जून - ऑगस्ट, उन्हाळी : फेब्रुवारी - एप्रिल |
| पेरणीची पध्दत | ३० से.मी. अंतरावर पेरणी करावी. |
| बियाणे ( कि./हे.) | ४० किलो / हेक्टरी |
| खते (कि./ हे.) | ४ टन शेणखत, २० किलो नत्र : ४० किलो स्फुरद पेरणीपुर्वी द्यावे |
| कापणी | पेरणीनंतर ६०-६५ दिवसांनी कापणी करावी. |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (क्वि./हे.) | २५० ते ३०० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - १३ ते १५% , काष्टमय तंतु २६.७%,खनिज पदार्थ ११.७०%, कॅलशियम ३३.६%, पचनियता ५९% |


Forage cowpea- Shweta

# ओट

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | फले (हरिता), केंट, फुले सुरभी |
| पेरणीची वेळ | आक्टोबर - नोव्हेंबर |
| पेरणीची पध्दत | ३० से.मी. अंतरावर पेरणी करावी. |
| बियाणे ( कि./हे.) | १०० किलो / हेक्टरी |
| खते (कि./ हे.) | ५ टन शेणखत, १२० किलो नत्र : ५० किलो स्फुरद : ४० किलो पालाश यापैकी ४०:५०:४० पेरणीच्या वेळी, ४० किलो नत्र पेरणीनंतर २५ दिवसांनी व उर्वरित ४० किलो पहिल्या कापणीनंतर. |
| कापणी | पहिली : ५० दिवसांनी, दुसरी : पहिल्या कापणीनंतर ३५ दिवसांनी |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (क्वि./हे.) | ५०० ते ६०० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ९ ते १०%, काष्टमय तंतु ३५.१%, खनिज पदार्थ १०.१%, पिष्टमय पदार्थ ४५.५%, |



Oat : Phule Harita



# बरसीम (घोडा घास)

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | वरदान, मेस्कावी |
| पेरणीची वेळ | आक्टोबर - नोव्हेंबर |
| पेरणीची पध्दत | ३० से.मी. अंतरावर पेरणी करावी. |
| बियाणे ( कि./हे.) | ३० किलो / हेक्टरी |
| खते (कि./ हे.) | ५ टन शेणखत, २० किलो नत्र : ८० किलो स्फुरद : ४० किलो पालाश पेरणीपुर्वी द्यावे. |
| कापणी | पहिली कापणी पेरणीनंतर ४५-५० दिवसांनी, नंतरच्या कापण्या २१-२५ दिवसांनी कराव्यात. |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (क्वि./हे.) | ६०० ते ८०० (३-४ कापण्या) |
| पोषण मुल्ये | प्रथिने - १७ ते १९ %, काष्टमय तंतु २५.९% , पचनियता ६०%, |



# संकरीत नेपीयर गवत

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | फुले जयवंत, फुले गुणवंत, वायफ - ११ |
| एपेरणीची वेळ | खरीप : जून - ऑगस्ट, उन्हाळी : फेब्रुवारी - मार्च |
| पेरणी | ९० x ६० से.मी. अंतरावर लागवड करावी. |
| बियाणे | एका जागी एक ठोंबे लावल्यास १८,५०० ठोंबे / हेक्टरी |
| खते | प्रति हेक्टरी १० टन शेणखत, २२५ किलो नत्र : ७५ किलो स्फुरद : ६० किलो पालाश द्यावे, यापैकी ७५:३७.५:३० किलो लागवडीच्या वेळी व ३०:३७.५:३० किलो बांधणीच्यावेळी (४ कापण्यानंतर) द्यावे. प्रत्येक कापणीनंतर ३० किलो नत्र प्रति हेक्टरी द्यावे. |
| कापणी | पहिली कापणी ६० दिवसांनी व नंतरच्या कापण्या ४५-५० दिवसांनी |
| उत्पादन /हे /वर्ष | हिरव्या चाऱ्यांचे १२०० ते १५०० क्विंटल (६-७ कापण्या) |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ९ ते १० %, काष्टमय तंतु ३०.१९% ,खनिज पदार्थ १२.३२%, सेल्युलोज ३३.५२%, एकुण पचनियता ६१.०८% |


संकरीत नेपिअर
वाण:जयवंत(बहुवर्षीय)
चाराउत्पन्न:२२५-२५०





# मारवेल

| लागवड पध्दत | बागायत |
|---|---|
| सुधारीत वाण | फुले गोवर्धन |
| पेरणीची वेळ | खरीप: जून - ऑगस्ट , उन्हाळी : फेब्रुवारी - मार्च |
| पेरणी | ४५ X ३० से.मी. अंतरावर दोन डोळे असलेली काडी लावुन लागवड करावी. |
| वियाणे | ७५००० दोन डोळे असलेली काडी एक डोळा जमीनीत व एक डोळा जमीनीच्यावर राहील अशा पध्दतीने लागवड करावी. |
| खते | ५ ते ७ टन शेणखत ३० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व २० किलो पालाश (प्रति हे.) पेरणीपुर्वी द्यावे. प्रत्येक कापणी नंतर ३० किलो नत्र द्यावे. (४०-४५ दिवसानी). |
| कापणी | वर्षातुन किमान ८ कापण्या कराव्यात |
| उत्पादन | हिरव्या चाऱ्यांचे ६०० ते ८०० (कि./हे.) |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ६ ते ७%, काष्टमय तंतु ३९.६०% , एकुण पचनियता ६१.३०%, खनिजे ११.२०%, ब्रिक्स ७.५०% |



फुले गोवर्धन

# मारवेल

| लागवड पध्दत | जिरायत |
|---|---|
| सुधारीत वाण | फुले मारवेल - ०६- ४०, फुले मारवेल -१ |
| पेरणीची वेळ | जून - ऑगस्ट |
| पेरणी | ४५ X ३० से.मी. अंतरावर प्रती हे. ७५००० ठोंबे लागवड करावी. |
| खते | ४ ते ५ टन शेणखत ३० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व २० किलो पालाश (प्रति हे.) पेरणीपुर्वी द्यावे. प्रत्येक कापणी नंतर ३० किलो नत्र द्यावे. (४०-४५ दिवसानी). |
| कापणी | वर्षातुन किमान २ कापण्या कराव्यात |
| उत्पादन | हिरव्या चाऱ्यांचे ३५० ते ४५० (कि./हे.) |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ६ %, काष्टमय तंतु ३८.६०% , पचनियता ५८%, खनिजे ११% |



फुले मारवेल – ०६–४०


# डोंगरी गवत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | डोंगरी २-४-११ |
| पेरणीची वेळ | जून - ऑगस्ट |
| पेरणीची पध्दत | ४५ से.मी. अंतरावर बियाणे लागवड करावी. |
| बियाणे (कि./हे.) | १० (कि./हे.) |
| खते (कि./हे.) | प्रत्येक वर्षी जुलै-ऑगस्ट महिन्यात ५० किलो नत्र द्यावे. |
| कापणी | वर्षातुन २ कापण्या कराव्यात (कोरडवाहु) |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (कि./हे.) | २०० ते ३०० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ५.५ ते ६ % |



# पवना गवत

| पवना गवत | |
|---|---|
| सुधारीत वाण | मोठा पवना १००-५ |
| पेरणीची वेळ | जून - ऑगस्ट |
| पेरणीची पध्दत | ४५ से.मी. अंतरावर बियाणे लागवड करावी. |
| बियाणे (कि./हे.) | १० (कि./हे.) |
| खते (कि./हे.) | प्रत्येक वर्षी जुलै-ऑगस्ट महिन्यात ५० किलो नत्र द्यावे. |
| कापणी | वर्षातुन २ कापण्या कराव्यात (कोरडवाहु) |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (कि./हे.) | २०० ते ३०० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ६ ते ७.५ % |



Pavana

# मद्रास अंजन गवत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | काझरी ७५, फुले मद्रास अंजन-१ |
| पेरणीची वेळ | जून - ऑगस्ट |
| पेरणीची पध्दत | ४५ X ३० से.मी. अंतरावर बियाणे लागवड करावी. |
| बियाणे (कि./हे.) | ७५००० ठोंबे / हे. |
| खते (कि./हे.) | ४ ते ५ टन शेणखत, ४० किलो नत्र, ३० किलो स्फुरद व २० किलो पालाश पेरणीच्यावेळी द्यावे. प्रत्येक कापणीनंतर २० किलो नत्र द्यावे. |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (कि./हे.) | ४०० ते ५०० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - ६ ते ७ %, एकुण पचनियता ५२% |


Madras Anjan

# लसूण घास

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | आर. एल. ८८, आनंद-२, आनंद-८ |
| पेरणीची वेळ | आक्टोबर - नोव्हेंबर, ३० से.मी. अंतरावर पेरणी करावी , हेक्टरी २५ किलो बियाणे |
| खते (कि./ हे.) | १० टन शेणखत, २० किलो नत्र : ८० किलो स्फुरद : ४० किलो पालाश पेरणीपुर्वी घावे. त्यानंतर प्रत्येक ४ कापण्यानंतर २० किलो नत्र : ५० किलो स्फुरद किंवा १०० किलो डी.ए.पी. प्रति हेक्टरी द्यावे. |
| पिक संरक्षण | मावा- निंबोळी अर्क ५ % फवारावे. जास्त प्रमाणात असेल तर लेकॅनीसीलीअम लेकॅनी किंवा मेटाऱ्हीझीयम ॲनीसोप्ली @ ५०gm / प्रति १० लीटर पाणी. |
| कापणी | पहिली कापणी : ५० दिवसांनी, पुढील कापण्या २१-२५ दिवसांनी कराव्यात |
| उत्पादन (क्वि./हे.) | हिरव्या चाऱ्याचे १००० ते १२०० (क्वि./हे.) प्रति वर्ष (१२-१४ कापण्या) |
| पोषण मुल्ये | प्रथिने - १९ ते २२ %, काष्टमय तंतु ३०.१३% ,खनिज पदार्थ १०.९९%, पिष्टमय पदार्थ ३६.६२%, |





# स्टायलो

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | फुले क्रांती |
| पेरणीची वेळ | जून - जुलै |
| पेरणीची पध्दत | ३० से.मी. अंतरावर काकऱ्या मारुन बी टाकावे अथवा बी फोकून पेरणी करावी पेरणीनंतर बियाणे मातीने झाकू नये. |
| बियाणे (कि./हे.) | १० किलो / हेक्टरी |
| खते (कि./हे.) | २० किलो नत्र, ४० किलो स्फुरद व २० किलो पालाश पेरणीच्या वेळी द्यावे. प्रत्येक वर्षी जुलै-ऑगस्ट मध्ये ५० किलो स्फुरद. |
| कापणी | वर्षातुन किमान २ कापण्या कराव्यात. |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन (कि./हे.) | २५० ते ३०० |
| पोषण मुल्ये | प्रथिने - १२ ते १४ %, काष्टमय तंतु ३५.८६% ,खनिज पदार्थ १०.४२%, सेल्यलोज २७.६७%, एकुण पचनिय ५०.६९% |





# दशरथ

## लागवड पध्दत

| | |
|---|---|
| सुधारीत वाण | को-१, को-२, टीएसएलएच-१ |
| पेरणीची वेळ | जून - जुलै |
| पेरणीची पध्दत | ६० से.मी. अंतरावर बियाणे लागवड करावी. |
| बियाणे | १५ किलो / हेक्टरी |
| बिज प्रक्रिया | चांगल्या उगवणशक्तीसाठी बियाणे कोमट पाण्यात अर्धा तास भिजत घालावे. नंतर सदरचे बियाणे रात्रभर थंड पाण्यात भिजत ठेवावे व त्यानंतर पेरणीपुर्वी सावलीत वाळवावे. |
| खते (कि./ हे.) | २० किलो नत्र : ५० किलो स्फुरद : २० किलो पालाश पेरणीपुर्वी द्यावे |
| कापणी | वर्षातुन ४-५ कापण्या कराव्यात |
| हिरव्या चाऱ्याचे उत्पादन | ५५० ते ६०० (क्वि./ हे.) |
| पोषण मुल्ये | प्रथिने - १६ ते १८ %, काष्टमय तंतु ३४% ,खनिज पदार्थ ५.६% |

# दशरथ



| चारा पिकांच्या प्रमुख शिफारशी | |
|---|---|
| १ | संकरीत नेपियर + लसुण घास या बागयतीचारा पिकाची २:१० या प्रमाणात अंतर पिक पध्दतीची शिफारस करण्यात येत आहे. ३० सेमी अंतरावर लसुण घाराच्या सलग १० ओळी व त्यानंतर ९० सेमीच्या दोन सऱ्यामध्ये संकरीत नेपियरची लागवड करावी. |
| २ | खरिप हंगामात ज्वारीच्या दोन ओळी + चवळीच्या दोन ओळी पट्टा पध्दतीने ३० सेमी अंतरावर पेरणी करावी. चारा कापणीनंतर रब्बी हगांमात वर्षिक लसुण घासाची लागवड करावी. |
| ३ | प्रचिलित सोयाबीन - गहु - चवळी या धान्य उत्पादनाच्या पिक पध्दती ऐवजी खालील पिक पध्दती आर्थिक दृष्टया फायदेशीर ठरतात.<br>अ) मका (चारा) - बरसिम (चारा) - ज्वारी (चारा)<br>ब) सोयाबीन (धान्य) - बरसिम (चारा) - मका (चारा)<br>क) सोयाबीन (धान्य) - बरसिम (चारा) - मुग (धान्य) |

संकरित गाय वजन ५०० कि.ग्रॅम

- १/३ खुराक
- २/३ चारा-वैराण
  - १/३ कोराडा चारा
    ७ कि.ग्रॅम
  - २/३ हिरवा चारा
    १७ कि.ग्रॅम
    - १/३ तृणधान्य चारा
      ६ कि.ग्रॅम
      दरसाल = २२०० कि.ग्रॅ.
      २.५ टन
    - २/३ द्विदल चारा
      ११ कि. ग्रॅम
      = ४५०० कि.ग्रॅ.
      ४.५टन

# बहुवार पिक नियोजन

| प्लॉट क्र. | क्षेत्र (आर) | पीक | लागवडीची वेळ | कापणीची वेळ | उत्पादन प्रति हे. (टन) | उत्पादन प्रति प्लॉट (टन) |
|---|---|---|---|---|---|---|
| **हंगाम - खरीप** | | | | | | |
| १. | १० | - | रिकामे | - | - | - |
| २. | १० | सकरीत नेपीयर (बहुवर्षीय) | जून | ऑगस्ट पासून पुढे कायमस्वरुपी | १५० प्रति वर्ष | ५.० |
| ३. | २० | मका | जुलै | सप्टेंबर-ऑक्टोबर | ६० | १२.० |
| ४. | १० | चवळी | जून | ऑगस्ट-सप्टेंबर | ४० | ४.० |
| ५. | १० | ज्वारी | जून | ऑगस्ट ते ऑक्टोबर | ५५ | ५.५ |
| एकूण | ६० | | | | आवश्यकता २३.० टन | २६.५ |
| **हंगाम - रब्बी** | | | | | | |
| १. | १० | मका | नोव्हेंबर | जानेवारी फेब्रुवारी | ६० | ६.० |
| २. | १० | सकरीत नेपीयर (बहुवर्षीय) | खरीप मध्येच लागवड केलेली | कायमस्वरुपी | १५० प्रति वर्ष | ५.० |
| ३. | २० | घास | ऑक्टोबर | नोव्हेंबर पासून पुढे | १२० प्रति वर्ष | ८.० |
| ४. | १० | मका | नोव्हेंबर | जानेवारी-फेब्रुवारी | ६० | ६.० |
| ५. | १० | बरसीम | नोव्हेंबर | डिसेंबर ते फेब्रुवारी | ८० | ८.० |
| एकूण | ६० | | | | आवश्यकता २३.० टन | ३३.० |

| हंगाम - उन्हाळी | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| प्लॉट क्र. | क्षेत्र (आर) | पीक | लागवडीची वेळ | कापणीची वेळ | उत्पादन प्रति हे. (टन) | उत्पादन प्रति प्लॉट (टन) |
| १. | १० | चवळी | मार्च | एप्रिल ते जून | ४० | ४.० |
| २. | १० | सकरीत नेपीयर (बहुवर्षीय) | खरीपमध्ये लागवड केलेले | कायमस्वरुपी | १५० प्रति वर्ष | ५.० |
| ३. | २० | लसूणघास (बहूवर्षीय) | रब्बीमध्ये लागवड केलेले | कायमस्वरुपी | १२० प्रति वर्ष | ८.० |
| ४. | १० | - | रिकामे | - | - | - |
| ५. | १० | मका | मार्च | मे-जून | ६० | ६.० |
| एकूण | ६० | आवश्यकता २३.० टन | | | | २३.० |
| आवश्यकता ७०.०टन | | | | | | ८०.० |



धन्यवाद